भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

# थेट मुलाखत (Walk in Interview)

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हिड-१९) या संसर्गजन्य रोगाची परिस्थिती नियंत्रीत करणेकामी वैद्यकिय आरोग्य विभागात कंत्राटी पध्दतीने एकत्रीत ठोक मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात २ (दोन) महिने कालावधीकरिता तातडीने खालिल प्रमाणे पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव | पद संख्या | मासिक एकत्रित ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी | ३२ | रूपये १,००,०००/- |
| २ | वैद्यकिय अधिकारी | मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस/बी.एच.एम.एस./ बी.यु.एम.एस. पदवी | | रूपये ७०,०००/- |
| ३ | **स्टाफ नर्स** | जी.एन.एम./बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रम उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | ५० | रुपये ४०,०००/- |
| ४ | **ए.एन.एम.** | ए.एन.एम./ एच.एस.सी.(वाणिज्य), नर्सिंग अभ्यासक्रम उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | २४ | रुपये ३०,०००/- |
| ५ | फार्मासिस्ट | डी फार्म/ बी. फार्म , अनुभव असल्यास प्राधान्य | ०५ | रुपये १७,०००/- |
| ६ | वॉर्डबॉय | ८ वी पास | ३८ | रुपये १५०००/- |
| ७ | एक्स-रे टेक्निशियन | माध्यमिक शालांन्त परिक्षा उत्तीण व मान्यता प्राप्त संस्थेकडील एक्स-रे टेक्निशियन अभ्यासक्रम पुर्ण | ०२ | रुपये १७०००/- |
| ८ | इ.सी.जी टेक्निशियन | माध्यमिक शालांन्त परिक्षा उत्तीण व मान्यता प्राप्त संस्थेकडील इ.सी.जी टेक्निशियन अभ्यासक्रम पुर्ण | ०२ | रुपये १७०००/- |

याबाबतची जाहिरात भि.नि.श. मनपाच्या संकेतस्थळावर **(bncmc.gov.in)** प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज, स्वपरिचय पत्र, शैक्षणिक कागदपत्रे, मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड इ. कागदपत्रे (मुळ व छायांकित प्रती) यांसह गुरुवार दि. १५/०४/२०२१ रोजी या कालावधीत सकाळी ११.३० वाजता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, मुख्य प्रशासकिय इमारत, दालन क्र.५०६, पाचवा मजला, काप आळी, भिवंडी, जि. ठाणे येथे थेट मुलाखतीकरिता उपस्थित रहावे.

**सर्वसाधारण अटि व शर्ती :-**

१.उपरोक्त पदांकरिता कालावधी २ महिने असणार आहे. आवश्यकता भासल्यास पुढील मुदतवाढ कामाच्या गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

२.वयोमर्यादा शासनाच्या नियमानुसार (शासकिय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत वयोमर्यादा शिथीलक्षम)

३.नेमणूकी संदर्भात निवड समितीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.



Scanned with CamScanner

४.सदर नेमणुक संपुर्णपणे अस्थायी स्वरुपाची असुन कोणत्याही उमेदवारास सदर जाहिर सुचनेच्या अनुषंगाने सेवेत कायम/नियमित केले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र करुन घ्यावे लागेल.

५.नियुक्ती देणे/नाकारणे तसेच नमुद कालावधीचे आत कोणत्याही क्षणी सेवेतुन कमी करण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त सो. यांचेकडे राखुन ठेवलेले आहेत.

६.वर नमुद पदसंख्येत आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात येईल.

**सही/-**

**उप-आयुक्त(मुख्यालय)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**



Scanned with CamScanner